महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २२/१२/२००९

मा.स्थायी समिती विशेष सभा
सभा सुचना क्र.२१दिनांक १६/१२/२००९
सभा क्रमांक १ दिनांक २२/१२/२००९

ठाणे महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची विशेष सभा मंगळवार दिनांक २२/१२/२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता कै.अरविंद कृष्णाजी पेंडसे सभागृहात सभा सुचना क्र.२१ दिनांक १६/१२/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेतील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. चंद्रगुप्त सिताराम घाग | सभापती |
| २. | श्री. भैय्यासाहेब (नागसेन)गंगाराम इंदिसे | सदस्य |
| ३. | श्री.पांडुरंग गोविंद पाटील | सदस्य |
| ४. | श्री.राजन नारायण किणे | सदस्य |
| ५. | श्री.हणमंत ज्ञानु जगदाळे | सदस्य |
| ६. | श्री.सुधीर विष्णु कोकाटे | सदस्य |
| ७. | श्री.दिलीप चंद्रकांत बारटक्के | सदस्य |
| ८. | श्रीमती सुरेखा सुरेख खातु | सदस्या |
| ९. | श्री.नजीब सुलेमान मुन्ना | सदस्य |
| १०. | श्री.दिनेश दाजी कांबळे | सदस्य |

सदर सभेस खालीलप्रमाणे सदस्य अनुपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.सुधाकर वामन चव्हाण | सदस्य |
| २. | श्री.सुभाष आत्माराम खारकर | सदस्य |
| ३. | सौ.स्मिता मधुकर देशमुख | सदस्या |
| ४. | श्री.यासीन अयुब कुरेशी | सदस्य |
| ५. | श्रीमती सुहासिनी सुनिल लोखंडे | सदस्या |
| ६. | श्रीमती कविता सुरेश पाटील | सदस्या |

<u>वंदे मातरम्‌ने सभेस सुरुवात करण्यात येते.</u>
<u>मा. सचिव सभेची विषयपत्रिकेवरील प्रकरण क्रमांक १४०४ वाचुन दाखवितात.</u>

<u>श्री. नाईक - मुख्य लेखा व वित्त अधिकारी :-</u>

मा.सभापती महोदय, मा. स्थायी समितीच्या मी असे निदर्शनास आणावयाचे आहे की, महासभेने जमा व खर्चाचे जे बजेट मंजूर करुन दिले आहे त्यापैकी जमा खर्चाच्या मूळ तरतूदीनुसार दर महिन्याच्या तीन ते चार तारखेपर्यत त्या महिन्यामध्ये झालेली जमा व त्या महिन्यामध्ये झालेला खर्च अशाप्रकारे मागील महिन्यापर्यत विगतवारी करुन दर दोन ते तीन तारखेच्या दरम्यान मा.आयुक्तांकडे मी मुख्य लेखा व वित्त अधिकारी म्हणुन रिपोर्ट सादर करीत असतो. हया सादर केलेल्या रिपोर्टनुसार मा.आयुक्त शहानिशा करुन ज्या खात्याची जमा कमी असेल त्या खातेप्रमुखांना त्या त्या वेळी पत्र देऊन जमा कमी असल्याबाबत निदर्शनास आणुन दिले आहे. आता माझ्याकडे नोव्हेंबर अखेरपर्यतचा गोषवारा आहे. त्यानुसार गेल्या वर्षीच्या उत्पन्नाच्या फक्त ४५% जमा जास्त झालेली दिसुन येते. ६७% गेल्या वर्षी महिनाअखेरपर्यत जे अपेक्षीत होते सार्व.बांधकाम, घनकचरा, अतिक्रमण, पाणी पुरवठा या खात्यांची जमा ६७% पेक्षा ब-याच प्रमाणांत कमी आहे. २०/१२/२००९ पर्यतची जमा पाहिली तर यामध्ये महापालिकेचे उत्पन्न आतापर्यत ५६.०८% जमा झालेली आहे. वास्तविक पाहता, ही जमा ७०% पर्यत होणे आवश्यक होती. याचा परिणाम आपल्याकडील जेएनएनयुआरएमचे प्रोजेक्ट तसेच इतर विविध प्रोजेक्ट आहे त्यामध्ये जी तरतूद केली आहे त्या तरतूदीप्रमाणे खर्च करावयाचा झाला तर हया जमेमध्ये वाढ होणे अत्यंत आवश्यक आहे. उत्पन्नाच्या वाढीबाबत आज आपण महत्वाची खाती घेतलेली आहेत त्यामध्ये जकात, कर वसुली, पाणी खाते,सार्व.बांधकाम, अतिक्रमण या खात्यांची उत्पन्न अत्यंत कमी आहे. आतापर्यत ३६% जमा आहे म्हणजे निम्मेच उत्पन्न जमा आहे. या बाबीकडेही लक्षपुर्वक पाहिले पाहिजे. असे मला सुचित करावयाचे आहे. या सभेमध्ये प्रत्येक खातेप्रमुख आपआपल्या खात्याची माहिती देतील अशी मी विनंती करतो.

<u>जकात विभाग :-</u>

जकात खात्याकडील उत्पन्नाबाबत साधकबाधक चर्चा झाली असता, जकातीचे या अर्थसंकल्पामध्ये ठरवून दिलेले उदिष्ट हे ३८४ कोटी रुपयांचे आहे. हे उदिष्ट साध्य करण्यासाठी जकात विभागाकडे कर्मचारी वर्ग अपुरा असल्याबाबत खातेप्रमुखांमार्फत सुचित करण्यात आले. तसेच उत्पन्न कमी झाल्याबाबत विविध कारणे सांगण्यांत आली. उप आयुक्त मुख्यालय यांचेकडून जकात विभागासाठी २० कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्यांत येईल असे सांगण्यात आले. कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्यांत आल्यानंतर जकातीचे उत्पन्न वाढीसाठी निश्चित जोरदार प्रयत्न करण्यात येईल असे सांगण्यात आले. आणि कर्मचारी वर्गाकडून काम करुन घेऊन जकातीचे उदिष्ट वर्षअखेरपर्यत ४०५ कोटीपर्यत नेण्यांत यावे असे सन्मा. सदस्यांनी जकातच्या खातेप्रमुखांना सुचना केली.

तसेच कर्मचारी कमी असल्याबाबत प्रत्येक खातेप्रमुखांची तक्रार असल्याने त्याबाबत उपआयुक्त मुख्यालय यांनी त्या त्या खात्याला शक्य तेवढा जास्त कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन दयावा अशीही सुचना करण्यात आली.

कर वसुली विभाग :-

कर वसुली विभागाबाबतची प्रभाग समितीनिहाय माहिती खातेप्रमुखांनी सभागृहामध्ये दिली. १९५ कोटी रुपयांचे उदिष्ट या अर्थसंकल्पामध्ये कर वसुली विभागाला देण्यात आलेले आहे. तेवढे उदिष्ट साध्य करण्यासाठी कर वसुली विभागालाही कर्मचा-यांची आवश्यकता असल्याचे सांगण्यांत आले. तसेच थकबाकी वसुलीसाठीही काही पर्याय निवडल्यास, नागरिकांना काही सवलत दिल्यास थकबाकी वुसल झाली तर निश्चितच उत्पन्नामध्ये वाढ होईल असे नमुद करण्यात आले. आर्थिक वर्षअखेरपर्यत कर वुसली विभागाला देण्यात आलेले उदिष्द पूर्ण करण्यात येईल असे कर वसुली विभागामार्फत सांगण्यात आले.

पाण्याची बिलेही कर वुसली विभागामार्फत करण्यांत यावी असे यापूर्वी ठरविण्यात आले होते. परंतू कर वसुली विभाग व पाणी खाते यांचा समन्वय नसल्याने पाण्याची बिले कोणी वुसल करावयाची याबाबत निर्णय होत नाही व उत्पन्न पाहिजे त्याप्रमाणांत मिळत नाही म्हणुन पाणी पुरवठा विभागाबाबत चर्चा करण्यासाठी श्री.लालासाहेब उपस्थित असतानाच चर्चा करण्यात येवून योग्य तो निर्णय घेण्यांत यावा असे ठरविण्यात आले.

स्थावर मालमत्ता विभाग :-

ठाणे महानगरपालिकेच्या ८५ शाळांपैकी ५१ शाळाचे भाडे वसुल केले जाते. उर्वरित शाळांचे भाडे वसुल होत नाही. शाळांचे भाडे निर्धारण करण्याचे काम चालू असल्याबाबतही नमुद करण्यात आले. तसेच स्थावर मालमत्तेबाबतच्या इतर बाबींबाबतही ऊहापोह करण्यात आला. तसेच ठाणे महानगरपालिकेमार्फत कोणकोणत्या वास्तु उभारण्यात आल्या आहेत याची माहितीही तसेच कोणकोणत्या वास्तुंचे भाडे ठाणे महानगरपालिकेला किती रक्कमेत मिळते याबाबतचीही सविस्तर माहिती स्थायी समितीला देण्यात यावी अशी सुचना करण्यात आली.

महापालिकेने जप्त केलेल्या वास्तुंचे नाममात्र भाडे आहे व सद्यस्थितीत ही रक्कम शुल्लक असल्याने जप्त केलेल्या वास्तुंचे भाडे वाढविणे अत्यावश्यक आहे. भाडेवाढीबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी येत्या महासभेमध्ये प्रशासनाकडून प्रस्ताव सादर करण्यात यावा अशी सुचना सन्मा.सदस्यांनी केली.

ठाणे महानगरपालिकेच्या शाळांचे हॉल हेही सुट्टीमध्ये भाडयाने दिले जातात त्यामध्येही भाडेवाढ होणे अत्यावश्यक आहे.स्टेडियम येथील गाळयांचे व्हॅल्युएशन करण्यात यावे. तसेच स्थावर मालमत्ता विभागाला रेकॅार्ड ठेवण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच तसेच शहर विकास विभागाशी संबंधित असलेला एक कार्यकारी अभियंता स्थावर मालमत्ता विभागाकडे अर्धवेळ देण्यात यावा. जेणेकरुन जागा महापालिकेच्या ताब्यात घेण्यात आलेल्या जागांचे हस्तांतरण करुन त्या स्थावर मालमत्ता विभागाकडे वर्ग करणेबाबतची कार्यवाही त्यांचेमार्फत होवू शकेल.

परवाना विभाग :-

परवाना विभागाकडे कर्मचारी नसल्यामुळे उत्पन्न वाढीसाठी काम करता येत नसल्याबाबत खातेप्रमुखाने सांगितले. परंतू असलेल्या कर्मचा-यांकडूनच काम करुन घेऊन परवाना विभागाला देण्यात आलेले उत्पन्नाचे उदिष्ट पूर्ण करण्यांत यावे अशा सुचना करण्यात आल्या.

ठाणे महानगरपालिकेमध्ये ब-याच खात्यांमध्ये कर्मचारी वर्ग पुरेसा नाही. तसेच वारसाहक्क व अनुकंपाने भरती करण्यात आलेली नाही याबाबत चर्चा करण्यांत आली असता, एमएमआरडीए तसेच जेएनएनयुआरएममार्फत विविध प्रोजेक्ट करीत असताना आस्थापना खर्चात वाढ होता कामा नये. असे आपल्याला केंद्र शासन व राज्य शासनाने सुचना दिलेल्या असल्याने नवीन स्टाफ घेता येत नाही. उपआयुक्त मुख्यालय यांनी सुचीत केले . परंतू अनुकंपा व वारसाहक्काने नोकरी मिळण्यासाठी प्रलंबित असलेले अर्ज निकाली काढयांत यावेत. वारसा हक्काने व अनुकंपावरील उमेदवारांना नोकरीत समाविष्ट करुन घेतले तर आस्थापना खर्चात वाढ होणार नाही. कारण आपल्याकडे असलेले कर्मचारी मृत्यु पावल्याने त्यांचे बदलीच आपण हे कर्मचारी घ्यावयाचे आहेत तरी हे अर्ज निकाली काढण्यांत यावेत अशी चर्चा सन्मा.सदस्यांनी केली.

सार्व.बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग व अतिक्रमण विभाग यांचे खातेप्रमुख उपस्थित असतील तेव्हाच या खात्यांच्या उत्पन्नाबाबत चर्चा करावी असे ठरविण्यात आले.

अशाप्रकारे उत्पन्न वाढीबाबत साधकबाधक चर्चा करुन ही सभा सायं.४.०० वाजता स्थगित करण्यात आली.

(तद्नंतर मा.सभापती स्थायी समिती सायं.४.०० वाजता सभा स्थगित केल्याचे जाहीर करतात.)

सभापती
स्थायी समिती
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

(सौ.छाया मानकर)
महापालिका सचिव
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

सभा स्थगित झाल्याची वेळ - सायं.४.०० वा.
दिनांक :- २२/१२/२००९
महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.